# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ५४ वी विशेष बैठक दि.१३ डिसेंबर २००७

### कार्यवृत्तांत व ठराव

मा. ना. श्री. रामराजे नाईक निंबाळकर, मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष मकृखोविम पुणे यांचे अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ५४वी विशेष बैठक दि. १३/१२/२००७ रोजी जलसंपदा विभागाचे परिषद सभागृह, मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आले.

**विषय क्र. ५४/१**

**जेष्ठ नागरीक संघ, बारामती व बारामती तालूका कुस्तीगीर संघ, बारामती या संस्थांना जमिनी वाटपाबाबत.**

सदर विषय नियामक मंडळासमोर मांडताना कार्यकारी संचालक व सदस्य सचिव यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने नियामक मंडळाचे मान्यतेने पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यातील जेष्ठ नागरीक संघ बारामती व बारामती तालुका कुस्तगीर संघ बारामती या दोन संस्थांना नियामक मंडळ बैठक क्र ४१ दि.११.८.२००४ नुसार ठराव क्र ४१/९ व ठराव क्र ४१/१० अन्वये भाडेपट्ट्याने जागा देण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे. दोन्ही संस्था समवेत करारनामा झालेला असुन दोन्ही संस्थांना तीस वर्षासाठी जागा भाड्याने देण्यात आलेल्या आहेत. भाडेपट्ट्याचा दर प्रतीमाह रू. १०१/- असा निश्चित करण्यात आलेला आहे. सदर निर्णयास श्री शामसुंदर हरिभाऊ पोटरे, रा.बारामती यांनी दि. २९-११-२००६ चे अर्जान्वये मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र. १४८/२००६ दाखल केलेली आहे. सदर याचिकेची सुनावणी दि.१०.१०.२००७ रोजी झाली त्याबाबत मा.उच्च न्यायालयाने असे निदेश दिलेले आहेत की, उपरोक्त दोन संस्थांना देण्यात आलेल्या जागांबाबत महामंडळ फेरविचार करण्यास तयार आहे काय? याबाबत महामंडळाचे वकीलांनी दोन आठवड्याच्या आत न्यायालयास निवेदन द्यावे. सदर प्रकरणांच्या दि.२४.१०.२००७ रोजी मा.उच्च न्यायालयात सुनावणीच्या वेळी अर्जदार यांनी अतिरिक्त सिव्हील ॲप्लीकेशन सादर केलेले आहे. ते सिव्हील ॲप्लीकेशन मा. उच्च न्यायालयाने दाखल करून घेतलेले आहे. अर्जदाराच्या अर्जाचा विचार करता प्रामुख्याने महामंडळास, महामंडळाच्या प्रयोजनाशिवाय (Purpose of Act) इतर प्रयोजनासाठी जागा भाडेपट्ट्याने देण्याचे अधिकार नसताना जागांचे वाटप झालेले आहे. असा मुद्दा उपस्थित केलेला आहे. या पार्श्वभूमीवर देण्यात आलेल्या जागांच्या वाटपाबाबत विचार करण्यासाठी व मा.उच्च न्यायालय यांच्या दि.१०.१०.२००७ चे निदेशानुसार महामंडळाची भूमिका निश्चित करण्याच्या दृष्टीने आजच्या नियामक मंडळात

मा. मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म, पुणे



कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ५४ वी विशेष बैठक दि.१३ डिसेंबर २००७

सदरचा विषय चर्चेसाठी मांडण्यात येत आहे. या चर्चेसाठी आवश्यक असणारी पूरक माहिती खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

१. जेष्ठ नागरीक संघ, बारामती व बारामती तालूका कुस्तीगीर संघ, बारामती या संस्थांना नागमात्र भाडेपट्टयाने दिलेल्या जागांच्या विरोधात श्री. शामसुंदर हरिभाऊ पोटरे रा. बारामती यांनी दिनांक २९/११/२००६ रोजी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका दाखल केली असून क्र. १४८ सन २००६ अंतर्गत सुनावणी चालू आहे. दिनांक १३/२/२००७ रोजी संबंधीत प्रतिवादी यांनी आपले म्हणणे (Say) वकिलामार्फत उच्च न्यायालयात मांडले होते.

२. सदरच्या जनहित याचिकेवर प्रथम सुनावणी दिनांक १०/१०/२००७ रोजी झाली व त्यामध्ये जेष्ठ नागरिक संघ बारामती आणि बारामती तालुका कुस्तीगीर संघ बारामती या संस्थांना दिलेल्या जागेच्या बाबत दोन आठवडयात फेरविचार करण्यास तयार आहे काय? अशी विचारणा मा. उच्च न्यायालयाने महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाला केली आहे.

३. मा उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या आदेशानुसार जेष्ठ नागरीक संघ, बारामती व बारामती तालुका कुस्तिगीर संघ, बारामती या दोन्ही संस्थांना दिलेल्या जागा महामंडळाचा कायदा १५ मधील प्रकरण ४, १८ (जे), १९ (२) अ व २८ या कलमांचे अधिन राहून दिलेल्या आहेत. सदर जागा प्रतिमहा रु. १०१/- या नाममात्र दराने ३० वर्षासाठी भाडेपट्टयाने दिलेल्या आहेत. त्यास भाडेपट्टयात वाढ करणेबाबत नियामक मंडळाच्या बैठकीत पूनर्विचार होणेबाबत विनंती करण्यात येत आहे.

४. **जागेबाबतचा तपशिल :-** बारामती हद्दीतील निरा डावा कालवा कि.मी. ७८ मधील सर्व्हे क्र. २७० लगतची ५०० चौ.मी. अतिरिक्त जमिन जेष्ठ नागरीक संघ बारामती या संस्थेचे अध्यक्ष श्री. सुर्वे यांनी दिनांक २६/७/२००४ रोजी केलेल्या विनंती अर्जानुसार व सादर केलेल्या प्रस्तावानुसार संस्थेस ३० वर्षासाठी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, नियामक मंडळाचे बैठकीतील ठराव क्रमांक ४१/९ दिनांक ११/८/२००४ अन्वये प्रति महा. रु. १०१/- या नाममात्र भाडेपट्टयाने देण्यात आली आहे.

सदर संस्थेने दिनांक २३/१२/२००४ रोजी जलसंपदा खात्याशी करारनामा केला असून जागा संस्थेच्या ताब्यात देण्यात आली आहे. जागेचा भाडेपट्टा संस्था नियमितपणे खात्याकडे भरत आहे.

५. बारामती हद्दीतील निरा डावा कालवा कि.मी. ७८ मधील सर्व्हे नं. २७० लगतची ६०० चौ.मी. अतिरिक्त जमिन बारामती तालूका कुस्तीगीर संघ,बारामती या संस्थेचे अध्यक्ष श्री.देवकाते यांनी दिनांक ९/८/२००४ रोजी केलेल्या विनंती अर्जानुसार व सादर केलेल्या प्रस्तावानुसार संस्थेस ३० वर्षासाठी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ नियामक



मा. मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.मं.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म, पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ५४ वी विशेष बैठक दि.१३ डिसेंबर २००७

मंडळाचे बैठकीतील ठराव क्र. ४१/१० दिनांक ११/८/२००४ अन्वये प्रतिमहा रु. १०१/- या नाममात्र भाडेपट्टयाने देण्यात आली आहे.

सदर संस्थेने दिनांक २७/१०/२००४ रोजी जलसंपदा खात्याशी करारनामा केला असून जागा संस्थेच्या ताब्यात देण्यात आली आहे. जागेचा भाडेपट्टा संस्था नियमितपणे खात्याकडे भरत आहे.

६. सदरची जागा संस्थेस कमी पडत आहे व वाहनतळासाठी जागा संस्थेकडे नसलेमुळे वाहनतळासाठी ३०० चौ.मी. व कुस्ती केंद्रसाठी २०० चौ.मी अशी एकुण ५०० चौ.मी. वाढीव जागा मिळणे बाबतचा विनंती अर्ज व प्रस्ताव संस्थेचे अध्यक्ष श्री. देवकाते यांनी दिनांक १०/५/२००६ रोजी खात्याकडे सादर केला. संस्थेच्या विनंती अर्जानुसार संस्थेस ३० वर्षासाठी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे बैठकीतील ठराव क्रमांक ४९/१४ दिनांक २६/९/२००६ अन्वये प्रतिमहा रु. १०१/- या नाममात्र भाडेपट्टयाने देण्यात आली.

सदर संस्थेने दिनांक १४/११/२००६ रोजी जलसंपदा खात्याशी करारनामा केला असून जागा संस्थेच्या ताब्यात देण्यात आली आहे. जागेचा भाडेपट्टा संस्था नियमितपणे खात्याकडे भरत आहे.

अतिरिक्त मुख्य सचिव (महसुल व वने) यांनी अशी विचारणा केली की, जागा कशा पध्दतीने देण्यात आलेल्या आहेत, यावर सचिव (लाक्षेवि) यांनी असे सांगितले की ३० वर्षाच्या मुदतीने भाडेपट्टयाने जागा दिलेली आहे. सदर जागा देताना या जागा सार्वजनिक हितार्थ देण्यात आलेल्या आहेत. याबाबत सदस्य सचिवांनी महामंडळाचा कायदा १५ मधील कलम १८ (जे), १९ (२) (अ), २८ व ६८ यांचे वाचन केले. यावर सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे एकमताने ठराव पारित करण्यात आला.

ठराव क्र. ५४/१

**'' ठराव करण्यांत येतो की, मा. उच्च न्यायालयाच्या जनहित याचिका क्रमांक १४८/०६ मधील दि.१०.१०.२००७ च्या सुनावणीच्या वेळी दिलेल्या निदेशास अनुसरुन जागा वाटपाच्या निर्णयाचा पुनर्विचार केला असता, जेष्ठ नागरीक संघ, बारामती व बारामती तालुका कुस्तीगीर संघ, बारामती हयांना भाडेतत्वावर दिलेल्या जागा हया सार्वजनिक उपयोगासाठी दिलेल्या असून, त्या संस्थांनी त्या जागेचे करारपत्र केलनंतर त्या जागेवर इमारती बांधल्या आहेत. त्यामुळे हया जागा परत घेताना, कायदेशीर अडचणी येण्याची शक्यता आहे. मात्र त्यांचेकडून भाडे वाढवून घेण्याबाबत करारातील अटी व शर्तीनुसार पुढील कार्यवाही करण्यांत येईल तसेच या संस्थांना कोणतेही आर्थिक उत्पन्न या जागांपासून घेता येणार नाही असेही या संस्थांना स्पष्ट करण्यांत येईल ''**

| | |
|---|---|
| मा. मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) | कार्यकारी संचालक |
| व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म, पुणे | म.कृ.खो.वि.म, पुणे |

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ५४ वी विशेष बैठक दि.१३ डिसेंबर २००७

मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय

विषय क्र. ५४/२

**पुणे जिल्हयातील खडकवासला प्रकल्पासाठी निधी प्राप्त करुन देण्यासाठी आवश्यक त्या स्त्रोतांचा अभ्यास करणेबाबत.**

सदर विषय नियामक मंडळासमोर मांडताना कार्यकारी संचालक यांनी असे सांगितले की, पुणे जिल्हयातील दौंड, इंदापूर, बारामती व हवेली तालुक्यातील काही भागाच्या क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्यासाठी खडकवासला प्रकल्पातील **२१ टीएमसी** इतके पाणी वापरुन ६२,१४६ हेक्टर क्षेत्रासाठी सिंचनाचा लाभ दयावयाचा आहे. पुणे जिल्हयातील खडकवासला प्रकल्पास शासन निर्णय दिनांक १०.७.१९५८ अन्वये रुपये १०.५४ कोटी इतक्या रकमेस मुळ प्रशासकीय मान्यता देण्यांत आली होती. मागील सुमारे ५० वर्षात प्रकल्पाच्या व्याप्तीमध्ये व किमतीमध्ये वाढ होऊन प्रकल्पावरती आतापर्यंत रुपये **३३६.१३** कोटी इतका खर्च झालेला आहे. तसेच अद्यापही प्रकल्पाची व्याप्ती मुळ अस्तरीकरण वगळता रुपये ५९.२३ कोटी इतका खर्च करणे शिल्लक आहे. खडकवासला प्रकल्प हा पूर्व पंचवार्षिक योजनेअंतर्गतचा प्रकल्प असून सदर प्रकल्प दिर्घकाळ चालु असून तो अंतिम होत नसलेने केंद्र शासन याबाबत नाराजीची भुमिका घेत आहे. त्यामुळे खडकवासला प्रकल्प मार्च २००८ पर्यंत पूर्ण करुन प्रकल्प पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. यावर सचिव (लाक्षेवि) यांनी अशी विचारणा केली की, खडकवासला प्रकल्पाची कोणती कामे बाकी आहेत, यावर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे यांनी प्रकल्पाच्या कामाची सद्यस्थिती विषद करुन सांगितली

तदनंतर कार्यकारी संचालक यांनी असे सांगितले की, महामंडळाची सध्याची आर्थिक स्थिती व मा.राज्यपाल यांचे निदेशानुसार होणा-या निधीचे वाटप यामुळे महाराष्ट्र कृष्णा खोरे महामंडळास अतिशय मर्यादित निधी प्राप्त होत आहे. त्यामुळे खडकवासला प्रकल्पास निधी उपलब्ध करुन देणे शक्य होत नाही. यास्तव खडकवासला प्रकल्पास इतर स्त्रोतांमधून काही निधी उपलब्ध करुन घेणेसाठी सर्व पर्यायांचा अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. या बरोबरीनेच लवादाच्या निर्णयाचे दृष्टीने राज्याचा पाण्यावरील हक्क अबाधित राखण्याच्या दृष्टीने काही धरणे व योजना पूर्ण करणे आवश्यक असून त्यासाठी देखील अशा प्रकारे पर्यायी स्त्रोतांचा अभ्यांस करणे गरजेचे आहे. यावर सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

| | |
|---|---|
| मा. मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) | कार्यकारी संचालक |
| व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म, पुणे | म.कृ.खो.वि.म, पुणे |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ५४ वी विशेष बैठक दि.१३ डिसेंबर २००७

ठराव क्र.५४/२ :-

" ठराव करण्यांत येतो की,

१) केंद्र शासनाने तातडीने पुर्णत्व अहवाल मागितलेल्या खडकवासला प्रकल्पास निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाच्या निधीशिवाय अन्य पर्यायी स्त्रोतांचा अभ्यास क्षेत्रीय स्तरावर करण्यांत यावा.

२) लवादाच्या दृष्टीने कृष्णा खोऱ्यातील अन्य महत्वाच्या योजनांची कामे करण्यासाठी शासनाचा निधी कमी पडत असल्याने, अशा योजनांसाठी पर्यायी स्त्रोतांचा अभ्यास करुन प्रस्ताव सादर करण्यांत यावा."

तदनंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने कार्यकारी संचालक व सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

मा. मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म, पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे